adani
Electricity

**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : अदाणी कॉर्पोरेट हाऊस, शांतिग्राम,
वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस. जी. हायवे,
खोडियार, अहमदाबाद, गुजरात ३८२४२१, भारत.
वेबसाइट : www.adanielectricity.com
CIN : U74999GJ2008PLC107256

# जाहीर सूचना

**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड-वितरणच्या अंधेरी पूर्व, मुंबई येथे असलेल्या सीप्झ एसईझेड क्षेत्रामधील मालमत्ता एईएमएल सीप्झ लि.कडे हस्तांतरित करण्याची मागणी करणा-या याचिकेवरील सूचना/आक्षेप (२०२२ मधील प्रकरण क्रमांक ३)**

१. अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.-वितरण **(AEML-D)** ने विद्युत कायदा, २००३ च्या १७ (३) अन्वये याचिका दाखल केली आहे. ती एमईआरसी (वितरण परवान्याची सामान्य स्थिती) विनियम, २००६ च्या नियमन ८.८ सह आहे. अंधेरी पूर्व, मुंबई येथे असलेल्या सीप्झ एसईझेड क्षेत्रातील तिची संपूर्ण मालमत्ता एईएमएल सीप्झ लि. **(ASL)** कडे हस्तांतरित करणेबाबतची ही याचिका आहे.

२. आयोगाने २० जुलै २०२२ रोजी ही याचिका दाखल करून घेतली असून विद्युत कायदा, २००३ च्या कलम ६४ (२) अंतर्गत या सूचनेद्वारे जनतेकडून सूचना/आक्षेप मागवण्यासाठी AEML-D ला सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

३. ६ जून २०२२ च्या आदेशानुसार, आयोगाने सीप्झ एसईझेड क्षेत्रासाठी ASLची डिम्ड वितरण परवानाधारक स्थितीची नोंद केली आहे. ASLला अंधेरी पूर्वेकडील सीप्झ एसईझेड परिसरात वीज वितरण आणि पुरवठ्याच्या सक्षमतेसाठी संबंधित क्षेत्रातील AEML-D ची विद्यमान वितरण आणि पुरवठा मालमत्ता ASLच्या नावे हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

४. ASLकडे हस्तांतरित केलेली मालमत्ता ही AEML-D च्या खात्यात विना भांडवली म्हणून नोंद होईल आणि या मालमत्तेच्या खर्चाचा भार AEML-Dच्या ग्राहकांवर येणार नाही. संबंधित दीर्घ-मुदतीच्या आणि अल्प-मुदतीच्या दायित्वांसहचे हस्तांतरित केले जाणारे मूल्य हे AEML-Dच्या खात्यानुसार यासंबंधीचे कायदे आणि नियमांसह निर्धारित केले जाईल. आयोगाने जारी केल्याप्रमाणे, वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी आणि शर्तींच्या प्रभावतेच्या तारखेनुसार, AEML-Dच्या खात्यातून ASLचे खाते काढून घेण्याच्या वेळी करता येईल. तथापि, अंधेरी पूर्वेतील सीप्झ एसईझेड परिसरात असलेल्या मालमत्तेचे ३१ मार्च २०२२ पर्यंतचे नियामक खात्यानुसारचे मूल्य पुढीलप्रमाणे आहे :

| **विश्लेषण** | **रुपये** (कोटींमध्ये) |
|---|---|
| भांडवलीकरणाच्या तारखेला मालमत्तेचे मूल्य | ३५.४७ |
| तारखेपर्यंत संचित घसारा | १८.३४ |
| मानक कर्ज | ७.५७ |
| नियामक समभाग शिल्लक | १०.६४ |

५. संबंधित याचिकेची प्रत (इंग्रजीत) ही त्याच्या परिशिष्ट आणि संलग्नकांसह रु. १०० भरून (किंवा रु. ५०/-मध्ये इंग्लिशमधील याचिकेची सीडी ही त्याच्या संलग्नक आणि संलग्नकांसह) लेखी विनंती केल्यानंतर AEMLच्या पुढील कार्यालयातून मिळू शकेल :

| **पत्ता** | **दूरध्वनी** | **ईमेल** |
|---|---|---|
| श्री. विवेक मिश्रा,<br>अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड,<br>सीटीएस ४०७/ए (नवीन), ४०८ (जुना),<br>गाव एकसर, देविदास लेन, एसव्हीपी रोडसमोर,<br>बोरिवली (पश्चिम), मुंबई 400103 | दूरध्वनी : +91 - 22 - 50549999 | vivek.g.mishra@adani.com |

६. याचिकेची सॉफ्ट कॉपी ही सर्व परिशिष्टांसह, डेटा गॅपच्या उत्तरांबरोबर डाउनलोड करण्यायोग्य स्वरूपात (विनामूल्य) AEML-Dचे संकेतस्थळ www.adanielectricity.com/corporate/regulatory वर उपलब्ध आहे.

७. आयोगाने AEML-D ला या सूचनेद्वारे वरील याचिकेवर जनतेकडून सूचना/आक्षेप मागवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून, सूचना/ हरकत दाखल करण्याचा इरादा असलेली प्रत्येक व्यक्ती ती इंग्रजी किंवा मराठी भाषेत इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे/ ईमेल: **ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in** यांना व "सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५ यांना उद्देशून ही सूचना प्रसिद्ध **(तारीख : २५ जुलै २०२२)** झाल्यापासून २१ दिवसांच्या आत पुराव्यासह श्री. विवेक मिश्रा, अतिरिक्त उपाध्यक्ष, व्यवसाय-नियामक, अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि., CTS 407/A (नवीन), ४०८ (जुने), गाव एकसर, देविदास लेन, एसव्हीपी रोडच्या बाहेर, बोरिवली (पश्चिम), मुंबई येथे सेवा ४००१०३ [ईमेल: vivek.g.mishra@adani.com] लिखित स्वरूपात सादर करू शकते.

८. वरील परिच्छेद ७ नुसार, ज्या प्रेषक/आक्षेप घेणाऱ्यांनी आपल्या टिप्पण्या/सूचना सादर केल्या आहेत, त्यांना ई-सार्वजनिक सुनावणीमध्ये वैयक्तिकरित्या सहभाग घ्यायचा असेल तर त्यांनी सूचना/आक्षेप दाखल करताना त्याचा विशेष उल्लेख करावा. अशा प्रकरणांमध्ये वैध ईमेल आयडी आणि मोबाइल क्रमांक सादर करणे अनिवार्य असेल. आयोग हे आपल्या विवेकबुद्धीनुसार, अशा प्रेषक/आक्षेपकर्त्याला ई-सार्वजनिक सुनावणी दरम्यान सहभागाची परवानगी देऊ शकतो. ई-सार्वजनिक सुनावणीला उपस्थित असलेले सर्व सहभागी १७ सप्टेंबर २०२० रोजी अधिसूचित दृकश्राव्य परिषदेद्वारे होणा-या ई-सार्वजनिक सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतील.

९. **१३ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता** दृकश्राव्य परिषदेद्वारे ई-सार्वजनिक सुनावणी आयोजित केली जाईल. तेव्हा मालमत्ता हस्तांतरणासाठी AEML-Dच्या याचिकेवर विचार केला जाईल. त्यासाठी वेगळी नोटीस जारी केली जाणार नाही.

१०. AEML-D हे त्यांना प्राप्त झालेल्या प्रत्येक सूचना/आक्षेपांना त्या मिळाल्याच्या तारखेपासून तीन दिवसात उत्तर देईल. मात्र **१६ ऑगस्ट २०२२** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना/आक्षेपांसाठी **१९ ऑगस्ट २०२२** नंतर उत्तर दिले जाणार नाही. AEML-D द्वारे प्रदान केलेल्या उत्तरावरील आक्षेप हे प्रेषक/आक्षेपकर्ते ई-सार्वजनिक सुनावणी दरम्यान किंवा १६ सप्टेंबर २०२२ पर्यंत नोंदवू शकतात.

ठिकाण : मुंबई
तारिख : २५ जुलै २०२२

**स्वाक्षरी**
किशोर पाटील
वरिष्ठ उपाध्यक्ष
अदाणी ईलेक्ट्रीसिटी मुंबई लि.